दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

आपुलकी जपली तरच नाती आधार बनतात आणि आयुष्य शांत, समृद्ध होते. नाती गोती रक्ताने जुळतात, पण विश्वासाने टिकतात. वाचतं.

## भारतावर अमेरिकेचा टॅरिफ वाढला

**मुंबई** : रशियाकडून तेल खरेदी केल्याच्या कारणावरून अमेरिकेने भारतावर लावलेला टॅरिफ पुन्हा वाढवण्यात आला आहे. गेल्या ऑगस्टमध्ये ५० टक्के टॅरिफची घोषणा झाल्यानंतर अमेरिकेचा भारतावर दबाव वाढतच आहे. यासोबतच अमेरिकेने व्हिसा नियमांत केलेल्या बदलांचा मोठा फटका भारतीय नागरिकांना बसत आहे. काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५०० टक्के टॅरिफची धमकी दिली होती.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २५ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १२३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा योजना

**महाराजगंज (उत्तर प्रदेश) :** प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सशस्त्र सीमा दल आणि पोलिसांनी महाराजगंज जिल्ह्यातील भारत-नेपाळ सीमेवर डॉग स्क्वॉडच्या तैनातीसह अनेक उपाययोजना केल्या आहेत, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. महाराजगंजचे एसपी सोमेंद्र मीणा यांनी सांगितले की, सशस्त्र सीमा दलाने (एसएसबी) नेपाळकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवर क्लोज सर्किट आणि ड्रोन कॅमेरे बसवले आहेत. या भागात दहशतवाद्यांची संभाव्य हालचाल रोखण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना सीमेवरून जाण्याची परवानगी देण्यापूर्वी लोकांची ओळख पटवून घेण्यास सांगण्यात आले आहे.

### कॅडरच्या आयपीएस अधिकाऱ्याची मालमत्ता जप्त

**बेंगळुरू :** नवी दिल्ली कर्नाटक राज्यात सन २०२१-२२ दरम्यान झालेल्या पोलीस उपनिरीक्षक भरतीतील कथित अनियमिततेच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने कर्नाटक कॅडरचे आयपीएस अधिकारी अमृत पॉल आणि हेड कॉन्स्टेबल श्रीधर एच. यांची मालमत्ता जप्त केली आहे. अंमलबजावणी संचालनालयाने जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांमध्ये निवासी घरे आणि इतर स्थावर मालमत्तांचा समावेश आहे.


### युतीची घाई नाही, योग्य वेळी निर्णय

**चेन्नई :** तामिळनाडूत निवडणुकांसाठी पुरेसा वेळ आहे आणि योग्य वेळी पक्ष युती करेल, असे मत डीएमडीकेच्या सरचिटणीस प्रेमलता विजयकांत यांनी व्यक्त केले. विलंबाबद्दल अटकळ फेटाळून लावत ती म्हणाली की तिच्या पक्षाला युतीची घोषणा करण्याची घाई नाही आणि माध्यमांना जास्त उत्सुक असल्याचा त्यांनी दोष दिला.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत भाजप-शिंदे गटाचे ११ उमेदवार बिनविरोध

# राज्यकर्त्यांनी केली लोकशाहीची थट्टा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडींचा पायंडा पाडल्यानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतही महायुती सरकारने तोच ट्रेंड कायम ठेवला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप महायुतीचे तब्बल ११ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने लोकशाही प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत भाजपचे १० आणि शिंदे गटाच्या शिवसेनेचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. यामध्ये जिल्हा परिषद गटातून पाच तर पंचायत समिती गणातून सहा उमेदवार बिनविरोध झाले आहेत. महापालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदेतही महायुतीने बिनविरोध निवडींचा पॅटर्न राबवल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे हा जिल्हा भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा मूळ जिल्हा आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली असून २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. या कालावधीत मोठ्या प्रमाणावर अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली असून काही विरोधी पक्षातील उमेदवारांनीही निवडणुकीतून अंग काढून घेतल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद गटात पाच आणि पंचायत समितीत सहा उमेदवार बिनविरोध झाले आहेत. जिल्हा परिषद गटात भाजपचे चार आणि शिंदे गटाचा एक उमेदवार बिनविरोध आहे, तर पंचायत समितीतील सर्व सहा उमेदवार भाजपचे आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत महायुतीकडून बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये खारेपाटण गटातून प्राची इस्वलकर, जानवली गटातून रुहिता राजेश तांबे, पडेल (देवगड) गटातून सुयोगी रवींद्र घाडी, बापर्डे (देवगड) गटातून अवनी अमोल तेली आणि बांदा गटातून प्रमोद कामत यांचा समावेश आहे.

कणकवली तालुका पंचायत समितीत बिडवाडी येथून संजना संतोष राणे आणि वरवडे येथून राजेश (सोनू) सावंत हे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. देवगड तालुका पंचायत समितीत पडेल येथून अंकुश यशवंत ठूकरूल, नाडण येथून गणेश सदाशिव राणे आणि बापर्डे येथून संजना संजय लाड हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. वैभववाडी तालुका पंचायत समितीत कोकिसरे येथून सौ. साधना सुधीर नकाशे यांचीही बिनविरोध निवड झाली आहे.

महायुतीकडून सातत्याने होत असलेल्या बिनविरोध निवडींमुळे निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया आहे की केवळ सत्ताधाऱ्यांच्या संमतीची औपचारिकता, असा प्रश्न आता खुलेपणाने उपस्थित केला जात आहे.

### बिनविरोध पॅटर्न

● राज्यातील २९ महापालिका निवडणुकीत भाजपने प्रचंड वर्चस्व मिळवले, तर ६९ उमेदवार मतदानापूर्वीच बिनविरोध निवडून आले. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी लोकशाही प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केला. आता हा ट्रेंड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही दिसत आहे. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेमुळे अनेक गटांत बिनविरोध उमेदवार ठरले. भाजप आणि महायुतीचे उमेदवार जिल्हा परिषद व पंचायत समिती गटातून सहज निवडले गेले आहेत.

## 'ऑपरेशन सिंदूर'वरील मतभेद तत्त्वाचे पक्षशिस्तीचा प्रश्नच नाही : थरूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई** :दहशतवादविरोधी कारवाई आणि दहशतवादाला प्रायोजित करणाऱ्या पाकिस्तानच्या भूमिकेबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची भूमिका मांडण्यासाठी परदेशात गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करताना 'ऑपरेशन सिंदूर'संदर्भात व्यक्त केलेला आपला मतभेद हा तत्त्वाचा होता, पक्षशिस्तीचा भंग करणारा नव्हता, असे काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी शनिवारी स्पष्ट केले. कोझिकोड येथे झालेल्या केरळ साहित्य महोत्सवात बोलताना थरूर यांनी या विषयावर सविस्तर भूमिका मांडली. संसदीय कामकाजात आपण नेहमीच पक्षाची अधिकृत भूमिका आणि सामूहिक निर्णय यांचेच प्रतिबिंब दाखवले असल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक व्यासपीठावर भारताच्या हिताचे प्रतिनिधित्व करणे हे पक्षीय राजकारणाच्या पलीकडे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करताना थरूर म्हणाले की, परदेशात अधिकृत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करत असताना भारताची राष्ट्रीय भूमिका परदेशी सरकारे आणि संस्थांसमोर स्पष्टपणे मांडणे आवश्यक होते. दहशतवादाविरुद्ध आंतरराष्ट्रीय सहमती निर्माण करणे आणि अतिरेकी कारवायांना पाठबळ देणाऱ्या पाकिस्तानच्या भूमिकेवर प्रकाश टाकणे, हेच या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे व्यक्त केलेला मतभेद हा तत्त्वनिष्ठ होता, पक्षीय अवज्ञा नव्हती, असे त्यांनी स्पष्ट केले.

## औषधे व सौंदर्यप्रसाधन नियमांचे उल्लंघन गंभीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** :औषधे व सौंदर्यप्रसाधन नियमांनुसार नमुने तपासणीसाठी पाठवल्यानंतर ६० दिवसांच्या आत अहवाल देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करत, या प्रक्रियेत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. तपासणी अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेही आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, औषध व सौंदर्यप्रसाधनांच्या गुणवत्तेशी संबंधित प्रकरणे थेट नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्याने, या बाबतीत कोणतीही दिरंगाई किंवा दुर्लक्ष सहन केले जाणार नाही. नियमांचे काटेकोर पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करावी, असे निर्देशही न्यायालयाने दिले. नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवल्यानंतर अहवाल वेळेत न मिळाल्यास उत्पादक, वितरक तसेच नागरिकांच्या हक्कांवर परिणाम होतो, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने प्रशासनाला अधिक पारदर्शक आणि जबाबदार यंत्रणा उभारण्याचे आदेश दिले.

## माहिती अधिकारातून राजकीय असंतुलन उघड

# गुजरातमधील एसआयआर मोहिमेत भाजपचे वर्चस्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद:** गुजरातमध्ये मतदार याद्यांचे विशेष गहन पुनरिक्षण करण्यासाठी तैनात करण्यात आलेल्या बूथस्तरीय प्रतिनिधींपैकी सुमारे दोन तृतीयांश प्रतिनिधी हे भारतीय जनता पक्षाशी संबंधित असल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. या आकडेवारीमुळे संपूर्ण प्रक्रियेतील राजकीय समतोल आणि तटस्थतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. गुजरातमध्ये एकूण ७३ हजार १६९ बूथस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले होते. यापैकी तब्बल ४९ हजार १६८ प्रतिनिधी हे भाजपचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेसकडे १८ हजार ५७ प्रतिनिधी असून आम आदमी पक्षाकडे ५ हजार ८९३ प्रतिनिधी आहेत. मात्र इतर पक्षांची उपस्थिती अत्यंत नगण्य आहे. बहुजन समाज पक्षाकडे केवळ ४९, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडे फक्त २५ प्रतिनिधी असून नॅशनल पीपल्स पार्टीकडे एकही प्रतिनिधी नाही. ही आकडेवारी विशेष गहन पुनरिक्षण प्रक्रियेतील बूथस्तरावरील यंत्रणेत मोठ्या प्रमाणावर झालेल्या राजकीय असंतुलनाकडे लक्ष वेधते.



विशेषतः पावसाळ्यानंतर गुजरातमध्ये परतलेल्या हजारो स्थलांतरित मजूर, बांधकाम कामगार आणि शेतमजूर या प्रक्रियेदरम्यान आपल्या गावांपासून दूर होते. त्यामुळे कोणता अर्ज भरायचा, कोणती कागदपत्रे जोडायची, जुने मतदार नकाशे किंवा नोंदी कशा सिद्ध करायच्या, याबाबत त्यांच्या मनात अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. अनेक मतदारांसाठी ही प्रक्रिया नागरिक कर्तव्यापेक्षा एक गुंतागुंतीचा प्रशासकीय चक्रव्यूह ठरली. मतदार नोंदणी अधिकारी, राजकीय पक्ष आणि सामान्य नागरिक यांच्यात समन्वय साधण्याची जबाबदारी बूथस्तरीय प्रतिनिधींवर होती. मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना मदत करणे, जनजागृती करणे आणि मार्गदर्शन करणे हे त्यांचे मुख्य काम होते. मात्र, जेव्हा या स्तरावर एका पक्षाचे प्रचंड वर्चस्व असते, तेव्हा त्या मदतीची तटस्थता संशयाच्या भोवऱ्यात सापडते. कोणाला मदत मिळते, किती वेगाने मिळते आणि किती स्पष्टतेने मिळते, यावर या प्रतिनिधींचा थेट प्रभाव पडतो. त्यामुळे ही केवळ प्रशासकीय बाब न राहता कायदेशीर आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित चिंता बनते. विशेष गहन पुनरिक्षणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना माहिती अधिकारातून मिळालेली ही आकडेवारी एक मूलभूत प्रश्न उपस्थित करते.

# सरकारविरोधी निर्णयानंतर न्यायमूर्तींची बदली

## न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांची कार्यकारी यंत्रणेवर कठोर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** एखाद्या न्यायमूर्तीने सरकारविरोधी निर्णय दिल्यानंतर त्यांची बदली करणे योग्य ठरत नाही, अशा शब्दांत न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी न्यायपालिका नियुक्ती प्रक्रियेतील कॉलेजियम व्यवस्थेतील कार्यकारी यंत्रणेच्या हस्तक्षेपावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एका कार्यक्रमात बोलताना न्यायमूर्ती भुयान यांनी स्पष्टपणे सांगितले की, न्यायालयीन स्वातंत्र्य टिकवायचे असेल तर न्यायमूर्तींच्या निर्णयांवर अप्रत्यक्ष दबाव निर्माण होईल, अशा कोणत्याही पद्धतीला थारा देता कामा नये. एखादा निर्णय सरकारला आवडला नाही म्हणून संबंधित न्यायमूर्तींची बदली करणे, हे न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणारे आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.



न्यायमूर्ती भुयान यांनी कॉलेजियम व्यवस्थेत कार्यकारी यंत्रणेचा वाढता प्रभावही अधोरेखित केला. न्यायमूर्तींच्या नियुक्त्या व बदल्यांमध्ये पारदर्शकता आणि स्वायत्तता राखणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात अनेक वेळा निर्णय प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेप होत असल्याचे संकेत त्यांनी दिले. यामुळे न्यायालयीन स्वातंत्र्य कमकुवत होण्याचा धोका असल्याचा इशाराही त्यांनी दिला. न्यायमूर्तींच्या बदल्या या केवळ प्रशासकीय बाब म्हणून पाहता येणार नाहीत, तर त्याचे दूरगामी परिणाम न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर होत असतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. न्यायाधीश निर्भयपणे निर्णय देऊ शकतील, असे वातावरण राखणे ही लोकशाहीची मूलभूत गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. न्यायमूर्ती भुयान यांच्या या परखड वक्तव्यामुळे न्यायपालिका, कार्यकारी यंत्रणा आणि कॉलेजियम व्यवस्था यांच्यातील नातेसंबंधांवर पुन्हा एकदा व्यापक चर्चा सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### एमआयएम नगरसेविका सहर शेख यांची लेखी माफी

**नवी दिल्ली :** आम अखेर ठाणे मुंब्रा शहराला "पूर्णपणे हिरवेगार करण्याबाबत" केलेल्या वक्तव्यामुळे वादात सापडलेल्या ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाच्या नगरसेविका सहर शेख यांनी अखेर लेखी माफी मागितली आहे. या वक्तव्यानंतर राजकीय वातावरण तापले होते. अखेर सहर शेख यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात हजर राहून आपला जबाब नोंदवला आणि दिलगिरी व्यक्त केली. या प्रकरणाचा पाठपुरावा भारतीय जनता पक्षाचे नेते किरीट सोमय्या यांनी केल्यानंतर पोलिसांनी सहर शेख यांना नोटीस बजावून पोलीस ठाण्यात पाचारण केले होते. त्यानंतर त्यांनी लेखी स्वरूपात माफीनामा सादर केला.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक कामकाजावर समन्वय साधण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी केंद्र सरकारने येत्या २७ जानेवारी रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. प्रत्येक अधिवेशनाच्या आधी पारंपरिकरित्या होणाऱ्या या बैठकीत सरकारची प्राधान्यक्रमांची यादी, अधिवेशनातील कामकाजाचे तात्पुरते वेळापत्रक आणि विरोधी पक्षांकडून उपस्थित केले जाणारे मुद्दे यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ही बैठक बोलावली असून ती २७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता संसद भवन ॲनेक्सीतील मुख्य समिती कक्षात होणार आहे. या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत.



अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात २८ जानेवारी रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त अधिवेशनातील अभिभाषणाने होणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी या अभिभाषणातून सरकारची आगामी काळातील व्यापक धोरणात्मक दिशा, वैधानिक उद्दिष्टे आणि प्राधान्यक्रम मांडले जाण्याची अपेक्षा आहे. सरकारच्या दृष्टीने, अधिवेशनादरम्यान अनेक महत्त्वाची विधेयके मांडली जाण्याची शक्यता असल्याने संसदेतील गोंधळ आणि वारंवार होणारे तहकूब टाळणे हा या सर्वपक्षीय बैठकीचा मुख्य उद्देश आहे. प्रस्तावित कायद्यांबाबत विरोधी पक्षनेत्यांना माहिती देणे आणि चर्चेसह मतदान सुरळीत पार पडावे यासाठी सहकार्य मागणे, यावर सरकारचा भर राहण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, विरोधी पक्ष या बैठकीचा उपयोग अधिवेशनात उपस्थित करावयाच्या राजकीय आणि आर्थिक मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी करणार असल्याचे संकेत आहेत.

## पश्चिम बंगालमधील एसआयआर घाईचे

# मतदारांवर आणि लोकशाहीवर अन्याय : अमर्त्य सेन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष गहन पुनरिक्षण प्रक्रियेबाबत (एसआयआर) नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही प्रक्रिया घाईघाईत राबवली जात असून त्यामुळे मतदारांच्या हक्कांना आणि भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना धक्का बसत असल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. बोस्टनहून दिलेल्या एका मुलाखतीत बोलताना ९२ वर्षीय सेन यांनी मतदार याद्यांचे पुनरिक्षण हे तत्त्वतः लोकशाही बळकट करणारे असू शकते, मात्र ते काळजीपूर्वक






आणि पुरेसा वेळ देऊनच केले गेले पाहिजे, असे मत मांडले. पश्चिम बंगालमध्ये मात्र ही अट पूर्ण होत नसल्याचे त्यांनी नमूद केले. पुरेशा वेळेसह आणि सखोल पद्धतीने मतदार याद्यांचा आढावा घेणे ही चांगली लोकशाही प्रक्रिया ठरू शकते; परंतु सध्या पश्चिम बंगालमध्ये तसे घडत नसल्याचे सेन यांनी सांगितले. मतदारांना आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही, ही बाब अन्यायकारक असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. विशेष गहन पुनरिक्षणाच्या काळातील स्वतःच्या अनुभवाचा उल्लेख करताना सेन म्हणाले की, निवडणूक अधिकाऱ्यांवरही वेळेचा स्पष्ट दबाव दिसून येत होता. शांतिनिकेतन येथील त्यांच्या मूळ मतदारसंघातून, जिथे त्यांनी यापूर्वी मतदान केले आहे आणि जिथे त्यांचे नाव, पत्ता व इतर तपशील अधिकृत नोंदींमध्ये उपलब्ध आहेत, तरीही त्यांना त्यांच्या जन्मतारखेपासून ते त्यांच्या आईच्या वयाबाबत प्रश्न विचारण्यात आले, ही बाब त्यांनी उदाहरणादाखल मांडली. ग्रामीण भागात जन्मलेल्या अनेक भारतीय नागरिकांप्रमाणेच आपल्याकडेही जन्म प्रमाणपत्र नसल्याचे सेन यांनी सांगितले. त्यामुळे मतदानाच्या पात्रतेसाठी अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची गरज भासते, असे त्यांनी स्पष्ट केले. अखेरीस आपला प्रश्न सुटला असला तरी, अशी मदत सर्वांनाच उपलब्ध होत नाही, याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. आपल्या मित्रांच्या मदतीमुळेच आपण या प्रशासकीय गुंतागुंतीतून बाहेर पडू शकलो, असे सांगत सेन यांनी अशा नागरिकांविषयी काळजी व्यक्त केली, ज्यांच्याकडे अशी मदत मिळवण्याची क्षमता किंवा ओळखी नाहीत. विशेष गहन पुनरिक्षण प्रक्रियेमुळे कोणत्या राजकीय पक्षाला फायदा होईल, या प्रश्नावर सेन यांनी थेट उत्तर देणे टाळले. मात्र लोकशाहीची अखंडता ही सर्वोच्च असली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. काही जाणकारांनी या प्रक्रियेचा फायदा भाजपला होऊ शकतो, असे सांगितल्याचे त्यांनी नमूद केले; मात्र ते खरे की खोटे, यापेक्षा निवडणूक यंत्रणेने सदोष पद्धतीचा आग्रह धरू नये, हा खरा मुद्दा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रक्रियेमुळे सर्वाधिक धोका कोणाला आहे, या प्रश्नावर सेन यांनी थेट उत्तर दिले. गरीब आणि उपेक्षित नागरिकांनाच याचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मिळवणे दलित, गरीब आणि वंचित घटकांसाठी अत्यंत कठीण ठरते. कागदपत्रांच्या अटींमधील वर्गीय पक्षपात हा थेट गरीबांच्या विरोधात काम करतो, असा इशाराही त्यांनी दिला.

# आयसीसीचा बांगलादेशला दणका

## टी-२० विश्वचषकातून पत्ता कट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने अखेर बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या आडमुठ्या भूमिकेवर कठोर कारवाई केली आहे. भारतात होणाऱ्या आगामी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये खेळण्यास सुरक्षेचे कारण देत नकार देणाऱ्या बांगलादेश संघाला आयसीसीने स्पर्धेतून अधिकृतरित्या बाहेर काढले आहे. बांगलादेशच्या जागी आता स्कॉटलंडचा संघ स्पर्धेत सहभागी होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने भारतातील सुरक्षेचे कारण देत विश्वचषकाचे सामने दुसऱ्या देशात हलवण्याची मागणी केली होती. ही मागणी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने फेटाळून लावली. आयसीसीने एक स्वतंत्र सुरक्षा समिती नेमली होती ज्याने भारतातील





सुरक्षेचा आढावा घेतला आणि धोके नसल्याचे स्पष्ट केले होते. असे असूनही बांगलादेशने आपल्या भूमिकेवर ठाम राहत सहभाग निश्चित केला नाही. बांगलादेशच्या सहभागाबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने, आयसीसीने त्यांना स्पर्धेतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची माहिती आयसीसीने बीसीबीला पत्राद्वारे दिली. स्पर्धेचे स्वरूप आणि वेळापत्रक कायम ठेवण्यासाठी तातडीने स्कॉटलंड संघाचा विश्वचषकात समावेश करण्यात आला आहे.

# संपादकीय

## न्यायालयाचा निकाल आणि राजकारणाचा अन्वयार्थ

**महाराष्ट्र सदन प्रकरणात छगन भुजबळांना मिळालेली क्लीन चिट ही निव्वळ एका नेत्याची सुटका ठरत नाही, तर तो तपास यंत्रणांची कार्यपद्धती, राजकीय आरोपांचे स्वरूप आणि न्यायालयीन प्रक्रियेतील विसंगती यांचा आरसा दाखवणारा निकाल ठरतो.**



छगन भुजबळांना महाराष्ट्र सदन प्रकरणात मिळालेली 'क्लीन चिट' ही एका नेत्याची कायदेशीर सुटका एवढ्यावरच मर्यादित राहत नाही. ती महाराष्ट्राच्या राजकारणातील तपास, आरोप, अटक आणि अखेरीस न्यायालयीन निष्कर्ष या संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे करते. जवळपास दहा वर्षे हे प्रकरण सार्वजनिक चर्चेत होते. त्या काळात भुजबळ हे भ्रष्टाचाराचे प्रतीक म्हणून मांडले गेले. आज न्यायालयाने गुन्हाच टिकत नसल्याचे सांगत त्यांना दोषमुक्त ठरवले आहे. या दोन टोकांमधील प्रवास समजून घेणे महत्त्वाचे ठरते. महाराष्ट्र सदन प्रकरणाचा गाभा सरकारी कामकाजातील कथित गैरव्यवहारांभोवती फिरत होता. सार्वजनिक बांधकाम, कंत्राटे, खर्च आणि त्यातून झालेली आर्थिक उलाढाल – या साऱ्यावर संशय व्यक्त करण्यात आला. त्या संशयाला राजकीय धार होती, कारण भुजबळ तेव्हा सत्तेतील प्रभावी मंत्री होते. तपास यंत्रणांनी अटक केली, तुरुंगवास झाला, मनी लॉन्डरिंगचे आरोप झाले. त्याच वेळी विरोधकांनी या प्रकरणाचा वापर राजकीय शस्त्र म्हणून केला. भ्रष्टाचारविरोधातील लढ्याचे हे एक मोठे उदाहरण म्हणून सादर करण्यात आले. आता न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, मूळ गुन्हाच सिद्ध होत नसेल तर त्यावर आधारित मनी लॉन्डरिंगचा आरोप उभा राहू शकत नाही. कायद्याच्या चौकटीत हा निष्कर्ष योग्य वाटतो. मात्र लोकशाहीत केवळ कायदेशीर बाजू पुरेशी नसते. जनमानसात निर्माण झालेली प्रतिमा, वर्षानुवर्षे चाललेली बदनामी आणि त्यातून तयार झालेली धारणा यांचे काय? न्यायालय दोषमुक्त करते, पण सार्वजनिक आयुष्यात त्या काळाचा ठसा सहज पुसला जात नाही. भुजबळ हे राजकारणातील अनुभवी खेळाडू आहेत. तुरुंगातून बाहेर आल्यानंतरही त्यांनी राजकीय अस्तित्व टिकवले. आता या निर्णयामुळे त्यांना नैतिक बळ मिळाले आहे. त्यांच्या समर्थकांसाठी हा न्यायाचा विजय आहे. पण याच वेळी हा निकाल तपास यंत्रणांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करतो. जर पुरावे इतके कमकुवत होते, तर अटक आणि दीर्घकालीन खटल्याची गरजच काय होती? आणि जर तपास योग्य होता, तर तो न्यायालयात टिकला का नाही? या प्रश्नांची उत्तरे आजही अस्पष्ट आहेत. या प्रकरणातून एक जुना मुद्दा पुन्हा पुढे येतो आणि तो म्हणजे तपास यंत्रणा आणि राजकारण यांचे नाते. आरोप हा की, यंत्रणांचा वापर राजकीय दबावाखाली केला जातो. जेव्हा सत्तासमीकरणे बदलतात, तेव्हा प्रकरणांचा वेग आणि दिशा बदलते. भुजबळ प्रकरणातही हा संशय व्यक्त केला जातो. तो सिद्ध करणे कठीण असले, तरी अशा निकालांमुळे तो अधिक बळावतो. लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास फक्त निकालावर नाही, तर प्रक्रियेवर अवलंबून असतो. लोकशाहीत न्यायालयाचा निर्णय अंतिम मानला जातो. मात्र न्यायालयीन सत्य आणि राजकीय सत्य यामध्ये अनेकदा अंतर असते. एखाद्या नेत्यावर वर्षानुवर्षे आरोप झाले, तुरुंगवास झाला आणि अखेरीस दोषमुक्ती मिळाली, तर सामान्य नागरिक गोंधळतो. दोषी कोणीच नसेल, तर एवढा काळ प्रकरण का चालले? आणि जर दोषी असतील, तर शिक्षा का झाली नाही? हा प्रश्न केवळ भुजबळांपुरता मर्यादित नाही. तो संपूर्ण व्यवस्थेचा आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात भ्रष्टाचाराचे आरोप नवे नाहीत. मात्र बहुतेक वेळा या आरोपांचा शेवट न्यायालयीन अपयशात होतो. परिणामी दोन परिणाम दिसतात – एकीकडे नेते दोषमुक्त होतात, तर दुसरीकडे भ्रष्टाचारविरोधातील लढ्याची विश्वासार्हता कमी होते. जनतेला असे वाटू लागते की, आरोप हे केवळ राजकीय सोयीचे साधन आहेत. छगन भुजबळांना मिळालेली 'क्लीन चिट' त्यांच्यासाठी दिलासादायक आहे. पण ती राज्यासाठी आत्मपरीक्षणाची संधीही आहे. तपास यंत्रणा अधिक सक्षम, अधिक व्यावसायिक आणि राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त असतील, तरच अशा प्रकरणांचा शेवट समाधानकारक होऊ शकतो. अन्यथा आरोप, अटक, तुरुंगवास आणि अखेरीस दोषमुक्ती हेच चक्र पुन्हा पुन्हा फिरत राहील. हा निकाल एका व्यक्तीच्या बाजूने असला, तरी प्रश्न व्यवस्थेचा आहे. न्यायालयाने आपले काम केले. आता उरते ते राजकारण आणि तपास यांच्यातील सीमारेषा स्पष्ट करण्याचे. ती स्पष्ट झाली नाही, तर 'क्लीन चिट' हे शब्द कायदेशीर असतील, पण लोकांच्या मनातील संशय कायम राहील.

# सहर शेख प्रकरण: माफी की मजबुरी?

मुंब्र्यासारख्या संवेदनशील सामाजिक वातावरणात शब्द हे केवळ भाषणाच्या पलीकडे जातात. इथे उच्चारलेले वाक्य सामाजिक तणाव वाढवू शकतात किंवा शांततेचा तोल सांभाळू शकतात. अशा भौगोलिक आणि सामाजिक स्थितीत जेव्हा राजकीय वक्ते भाषण देतात, तेव्हा त्या वक्तव्यातील शब्दांवर नागरिकांचे, समाजाचे आणि राजकीय संतुलनाचे लक्ष लागलेले असते. एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांच्या वक्तव्याभोवती उभा राहिलेला वाद हा फक्त एका माफीनाम्यावर संपणारा वाद नाही, तर आजच्या राजकारणातील धोकादायक प्रवृत्ती उघड करणारा आहे.

निवडणूक जिंकल्यानंतर केलेले भाषण, त्यातील शब्दांची निवड, आशय आणि त्यानंतर दिलेली माफी या सर्वांचा विचार केला तर एक स्पष्ट गोष्ट दिसते — ही चूक अचानक तोंडून निघालेली नव्हती; ती एका विशिष्ट मानसिकतेतून आलेली होती. आणि जेव्हा प्रतिक्रिया तीव्र झाल्या, तेव्हा माफी हा एकमेव पर्याय उरला.

राजकारणात माफीचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे चूक जाणवल्यानंतर स्वतःहून मागितलेली माफी; दुसरी म्हणजे अडचणीत सापडल्यानंतर केलेली माफी. सहर शेख यांची माफी दुसऱ्या प्रकारात मोडते. कारण त्या माफीनाम्याआधी कोणतीही आत्मपरीक्षणाची प्रक्रिया किंवा दोष स्वीकारल्याचे संकेत दिसले नाहीत. उलट, "शब्दांचा विपर्यास झाला" अशी ढाल पुढे करून दोष काही बाह्य कारणांनी झाला, असा संदेश देण्यात आला.

मुंब्रा ही केवळ एक नगरपरिसर नाही; तो सामाजिक समतोलाची कसोटी आहे. येथे भाषण करताना "आम्ही आणि ते" अशी सरळ रेषा आखली की परिणाम तुरुंगात जाणारे नसले तरी भावना विभाजित करणारे दिसतात. त्यामुळेच या वक्तव्यावर भाजपने तीव्र प्रतिक्रिया दिली. किरिट सोमय्या यांनी हे प्रकरण केवळ राजकीय मुद्दा म्हणून नव्हे, तर सार्वजनिक शांततेशी जोडून

**» मुंब्र्यातील बेताल वक्तव्य आणि त्यानंतरची माफी हे एखाद्या व्यक्तीचे चुकलेले शब्द नाहीत, तर एका ठरावीक राजकीय मानसिकतेचे लक्षण आहे. आधी समाजात विष पेरायचे आणि विरोध झाला की माफीच्या आड लपायचे हा प्रकार लोकशाहीसाठी अधिक घातक ठरतो आहे.**



उपस्थित केले. पण या आरोप-प्रत्यारोपांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न दुर्लक्षित झाला – अशा वक्तव्यांना राजकीय पाठबळ कुठून मिळते?

सहर शेख एकटी नाहीत. त्या एका विशिष्ट राजकीय संस्कृतीचे उत्पादन आहेत, जिथे बहुसंख्याकांविरोधात आक्रमक भाषा बोलणे हे 'धैर्य' मानले जाते. जिथे ध्रुवीकरण हे राजकारणाचे मुख्य साधन बनले आहे. या प्रवृत्तीमध्ये मतभेद मांडताना समाजाच्या संवेदनशील पैलूंना दुर्लक्ष करून भाषणात तीव्र शब्दांचा वापर केला जातो, तर त्याचा परिणाम सामाजिक तणावाकडे होतो.

माफीनाम्यात "तिरंग्यासाठी जगू" असे वाक्य येते. ऐकायला हे वाक्य देशभक्तीपूर्ण वाटते; परंतु तिरंगा हा वाद मिटवण्यासाठीचा ढाल नसतो, तो मूल्यांची आठवण करून देणारा प्रतीक आहे. तो वापरून वेगळीच मानसिकता मांडली जाते. हाच प्रश्न विचारायला हवा की तिरंगा हातात घेण्याआधी मनातली भाषा बदलते का? संघटनात्मक बदल आणि सांस्कृतिक जबाबदारी यांचा विचार असल्याशिवाय राष्ट्रध्वजाचे वाक्य वापरणे प्रभावी राजकीय वक्तव्य ठरत नाही.

या प्रकरणातून समाजमाध्यमांची भूमिका स्पष्टपणे दिसून येते. भाषणाचा एक भाग व्हायरल होतो, मग स्पष्टीकरण येते, मग माफीनामा. पण मूळ वक्तव्य मागे जात नाही. ते आधीच समाजात रुजलेले असते. "मी असं म्हणायचं नव्हतं" हे स्पष्टीकरण अनेकदा निष्प्रभ होतं. कारण शब्द आधीच समाजात मानसिक ठसा उमटवलेले असतात. राजकारणात भाषेची जबाबदारी कायद्यापेक्षा मोठी असते; कारण कायदा नंतर येतो, पण शब्द आधीच भावनांवर घाव करतात.

मुंब्रा, भिवंडी, मालेगावसारख्या भागांत शब्द हेच सर्वात धारदार शस्त्र असतात. ते कुणाच्या हातात आहे आणि कसे वापरले जात आहेत, यावर शांतता अवलंबून असते. या प्रकरणाचा शेवट माफीवर झाला असे मानले जात असले, तरी प्रश्न सुटलेला नाही. कारण उद्या दुसरे कोणी, दुसऱ्या व्यासपीठावर, वेगळ्या शब्दांत तेच बोलेल; आणि पुन्हा एक माफी येईल. ही साखळी थांबवायची असेल, तर फक्त व्यक्तीवर नाही, तर त्या मागच्या राजकीय प्रवृत्तीवर बोट ठेवावे लागेल.

लोकशाहीमध्ये मतभेद अपरिहार्य आहेत. मतभेद मांडताना समाज फाटेल अशी भाषा वापरणे हा राजकीय पराभव असतो. सहर शेख यांची माफी ही त्या पराभवाची कबुली आहे; जाणीवपूर्वक दिलेली नसली, तरी परिस्थितीने भाग पाडलेली. आज प्रश्न इतकाच नाही की काय बोलले गेले; खरा प्रश्न हा आहे की पुढच्या वेळी बोलण्याआधी कोण थांबणार आहे? आणि हीच चिंतेची खरी बाब आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर-उपमहापौर निवडणुकीची तारीख जाहीर

## ६ फेब्रुवारीला विशेष सभा; भाजपमध्ये महापौरपदासाठी इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) महापौर व उपमहापौर निवडणुकीचा कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार महापौर आणि उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २ फेब्रुवारी २०२६ असून, प्रत्यक्ष निवडणूक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. याच दिवशी सकाळी ११ वाजता नवनिर्वाचित नगरसेवकांची विशेष सभा आयोजित करण्यात आली असून, या सभेत महापौर आणि उपमहापौरांची निवड



केली जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला असून, या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने सलग दुसऱ्यांदा एकहाती सत्ता मिळवली आहे. निकालानुसार भाजपचे ८४ नगरसेवक निवडून आले असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ३७, शिवसेना (शिंदे गट) ६ तर १ अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे. स्पष्ट बहुमत असल्याने महापौरपदावर भाजपचाच उमेदवार विराजमान होणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

महापालिकेचे नगरसचिव मुकेश कोळप यांनी दिलेल्या माहितीनुसार, महापौर व उपमहापौर पदासाठी होणारी ही विशेष सभा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. यंदा ही दोन्ही पदे खुल्या (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी आरक्षित असल्याने भाजपमधील अनेक इच्छुक नगरसेवक सक्रियपणे मोर्चेबांधणी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

राजकीय वर्तुळात महापौरपदासाठी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, नगरसेवक रवी लांडगे, नितीन लांडगे, राहुल कलाटे, तुषार हिंगे आणि उत्तम केंदळे यांची नावे चर्चेत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे भाजपमध्येच अंतर्गत चुरस वाढल्याचे दिसून येत आहे.

# शिवसेना (शिंदे) पक्षाच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीनंतर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) ने आपला गट मजबूत करण्याचा पाऊल उचलले आहे. शनिवारी झालेल्या खास बैठकेंत शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नगरसेवकांनी विश्वजीत बारणे यांना एकमताने गटनेतेपदी निवडले आहे. ही बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली, ज्यात सर्व नगरसेवक उपस्थित होते आणि त्यांनी बारणे यांच्यावर पूर्ण विश्वास व्यक्त केला.

विश्वजीत बारणे हे शिवसेनेच्या स्थानिक नगरसेवकांमध्ये युनॅनिमस (एकमताने) गटनेतेपदी निवडले गेले आहेत, ज्यामुळे पक्षातील एकात्मता आणि स्थानिक निर्णय प्रक्रियेत स्पष्टता निर्माण होण्याची अपेक्षा आहे. बैठक अध्यक्षपदी जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

बारणे हे खासदार श्रीरंग बारणे यांचे चिरंजीव असून, त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत प्रभाग २४ (थेरगाव गावठाण) मधून प्रथमच नगरसेवकपदी निवडून यशस्वी होण्याची सुरुवात केली आहे. त्यांनी आपल्या पहिल्या टर्ममध्ये पक्षासाठी आणि शहर विकासासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

विश्वजीत बारणे यांच्या नेतृत्वाखाली, शिवसेना (शिंदे गट) अधिक संघटितपणे निर्णय प्रक्रिया, शहरातील विकास विषयक मुद्दे आणि महापालिका समित्यांमधील चर्चांमध्ये भाग घेण्याचा प्रयत्न करेल.

# पिंपरी-चिंचवड महापालिका पराभवानंतर राष्ट्रवादीत खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत २०२६ मध्ये सलग दुसऱ्यांदा पराभव स्वीकारावा लागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. भाजपने महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवल्यानंतर राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये पराभवाच्या कारणांवरून आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली असून, त्यामुळे पक्षाच्या एकात्मतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### पराभवाचे खापर कोणाच्या माथी?

पराभवानंतर पक्षांतर्गत नाराजी उघडपणे समोर येत आहे. पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी प्रचार यंत्रणा प्रभावीपणे राबवली न गेल्याचा आरोप करत काही वरिष्ठ नेत्यांवर थेट बोट ठेवले आहे. आमदार अण्णा बनसोडे आणि माजी आमदार विलास लांडे यांनी प्रचारात अपेक्षित सक्रियता दाखवली नाही, असा आरोप बहल यांनी केला आहे.

### स्थानिक नेत्यांवरही नाराजी

केवळ वरिष्ठच नव्हे तर काही स्थानिक नेत्यांवरही टीकेची झोड उठवण्यात आली आहे. काही नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या प्रभागांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी इतर भागांत वेळ घालवला, त्यामुळे मतांची घसरण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर पक्षातील समन्वयाचा अभाव प्रकर्षाने समोर आला आहे.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाला केवळ ३७ जागांवर समाधान मानावे लागले, तर भाजपने ८४ जागा जिंकत महापालिकेवर पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले.

# नगरसेविका निवडून, पण कारभार पतीकडेच? पुणे महापालिकेत 'नवऱ्यांचा हस्तक्षेप' चर्चेत

## खराडी-वाघोलीतील बैठकीचा व्हिडीओ व्हायरल; महिला आरक्षणाच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीचा निकाल लागून आठवडा उलटत नाही, तोच महिला नगरसेविकांच्या सत्तेवर त्यांच्या पतींचाच अघोषित अंमल सुरू झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खराडी-वाघोली परिसरातील एका नवनिर्वाचित नगरसेविकेच्या पतीने थेट स्वच्छतेच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांची जाहीर झाडाझडती घेतल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, यामुळे महापालिकेच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत यंदा तब्बल ८७ महिला नगरसेविका निवडून आल्या असून, महापौरपदही



महिलेकडे जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिलांना राजकीय निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळावी, या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात मात्र निर्णय घेण्याचे अधिकार अजूनही पुरुषांकडेच असल्याचे चित्र पुन्हा एकदा उघड झाले आहे.

वाघोली परिसरात महापालिका कर्मचाऱ्यांनी नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमानंतर स्वच्छतेबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत संबंधित नगरसेविका उपस्थित असूनही त्या पूर्ण वेळ शांत राहिल्या, तर त्यांचे पतीच अधिकाऱ्यांना सूचना देताना, प्रश्न विचारताना आणि थेट जाब विचारताना दिसून आले. या बैठकीचा व्हिडीओ व्हायरल होताच नागरिकांसह राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. 'नगरसेविका नावापुरती आणि कारभार पतींचाच' अशी टीका सोशल मीडियावर जोर धरू लागली आहे. महिला आरक्षणाचा खरा उद्देश साध्य होतो आहे का, की महिलांच्या नावावर पुन्हा पुरुषच सत्तेचा वापर करत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महिला नगरसेविकांना स्वतंत्रपणे काम करण्याची संधी मिळणार का? प्रशासकीय बैठकींमध्ये पतींचा हस्तक्षेप कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे का? महापालिका प्रशासन अशा प्रकारांवर कारवाई करणार का? असे अनेक प्रश्न या घटनेमुळे निर्माण झाले आहेत. या प्रकरणामुळे पुणे महापालिकेतील नव्या कारभाराची दिशा आणि महिला सक्षमीकरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांना डावलले जाणार की न्याय मिळणार?

## स्वीकृत नगरसेवकपदाबाबत प्रश्नचिन्ह; प्रचंड बहुमतानंतरही तळागाळातील कार्यकर्ते संभ्रमात; संधी जुने निष्ठावानांना की आयाराम-गयारामांना?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीने प्रचंड बहुमत मिळवत एकहाती सत्ता स्थापन केली असली, तरी शहरातील जुन्या आणि निष्ठावान भाजप कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढताना दिसत आहे. विशेषतः स्वीकृत नगरसेवक पदांवर जुन्या कार्यकर्त्यांना संधी मिळणार का, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. महापालिका निवडणुकीत अनेक जुने कार्यकर्ते असूनही त्यांना उमेदवारी देण्यात आली नाही. त्याचप्रमाणे शहर कार्यकारिणीतही अनेक अनुभवी, तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्थान मिळाले नाही.



आता सत्ता मिळाल्यानंतर किमान स्वीकृत नगरसेवकपदावर तरी या कार्यकर्त्यांना न्याय मिळेल का, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शहरात गेल्या अनेक वर्षांपासून नागरी समस्या सोडवण्यासाठी आंदोलनं, मोर्चे काढणारे कार्यकर्ते भाजपच्या माध्यमातून सक्रिय होते. या आंदोलनांदरम्यान काहींवर फौजदारी गुन्हेही दाखल झाले. मात्र, निवडणुकीच्या काळात ऐनवेळी पक्षात आलेल्या नव्या कार्यकर्त्यांना, विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांना संधी दिल्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. "नवे गडी, नवे राज्य" या धोरणामुळे आपल्याला पुन्हा एकदा डावलले जात असल्याची भावना कार्यकर्त्यांत आहे.

चिंचवडचे आमदार शंकर जगताप, भोसरीचे आमदार महेश लांडगे तसेच शहर नेतृत्वाची भूमिका काय राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्वीकृत नगरसेवकपदावर आमदारांचे समर्थक, नव्याने आलेले चेहरे संधी मिळवणार की खरोखरच पक्षासाठी झटलेले जुने कार्यकर्ते निवडले जाणार, हा प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

येत्या आठ-दहा दिवसांत महापौरपदाची घोषणा होणार असून, त्यानंतर स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर होण्याची शक्यता आहे. मात्र, पुन्हा एकदा केवळ संघटनात्मक कामांसाठी कार्यकर्त्यांनी "सतरंजी उचलायची" वेळ येणार का, की हातात काहीतरी पडणार, याची प्रतीक्षा शहरातील बहुतांश भाजप कार्यकर्ते करत आहेत.

महेश कुलकर्णी, अमोल थोरात, राजू दुर्गे, सचिन लांडगे, कुणाल लांडगे, सचिन काळभोर यांच्यासह अनेक जुन्या कार्यकर्त्यांना संधी मिळणार का, याकडे पिंपरी-चिंचवड शहराचे लक्ष लागले आहे. पक्ष नेतृत्व आणि सत्ताधारी आमदार कोणता निर्णय घेतात, यावर भाजपच्या अंतर्गत राजकारणाची दिशा ठरणार आहे.

### भाजपाचे 7, राष्ट्रवादीचे 3 स्वीकृत नगरसेवक कोण ?

● सन २०२३ च्या नव्या नियमानुसार महापालिकेत एकूण १० स्वीकृत नगरसेवक असणार आहेत, भाजपाला सर्वाधिक ७ तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे ३ स्वीकृत नगरसेवक असणार आहेत. भाजपाकडून माजी नगरसेवक राजू दुर्गे, माजी महापौर उषा ढोरे, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, विलास मडिगेरी, सिद्धेश्वर बारणे, सचिन साठे, राज तापकीर, दीपक भॉडवे, माजी महापौर संजोग बाघेरे यांचा मुलगा ऋषिकेश वाघेरे-पाटील, सचिन काळभोर, संदीप काटे, अमोल थोरात, राजेश पिल्ले, संतोष वारणे, इतर पदाधिकारी व माजी नगरसेवक इच्छुक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी नगरसेवक विनायक रणसुभे, मोरेश्वर भोंडवे, वसंत बोराटे, मयूर कलाटे, माजी नगरसेविका सीमा सावळे, पक्षाचे शहर कार्याध्यक्ष फजल शेख व इतर पदाधिकारी इच्छुक आहेत.

# नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केलेला त्याग, त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि राष्ट्रनिष्ठा आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या विचारांमुळे कर्तव्यभावना, धैर्य आणि देशसेवेची जाणीव निर्माण होते, जी समाजासाठी दिशादर्शक ठरते. तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सामाजिक जाणीव, स्पष्ट विचार आणि प्रभावी संवादाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना आत्मसन्मान आणि जबाबदारीची जाणीव निर्माण केली, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नेताजी आणि बाळासाहेब यांची जयंती साजरी करण्यासाठी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त बगाडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे संदेश दिले. कार्यक्रमास उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यामुळे नागरिकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक जाणीव आणि कार्यप्रेरणा जागृत होण्यास मोठा हातभार लागला. पिंपरी महापालिकेच्या या उपक्रमातून नेताजी आणि बाळासाहेब यांच्या आदर्शांचे स्मरण करून समाजात सकारात्मक संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वाघिरे महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**ओतूर :** येथील अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने कला शाखेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात पार पडला. विभागप्रमुख प्रा. डॉ. आमश्या पाडवी यांनी प्रास्ताविकातून विभागाची वाटचाल मांडली. प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी माजी विद्यार्थी हीच महाविद्यालयाची खरी संपत्ती असल्याचे सांगितले. कार्यक्रमात माजी विद्यार्थी व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

### संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात हरिनाम सप्ताह सांगता

**आळंदी :** आळंदी येथील वडमुखवाडीमधील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता झाली. कीर्तनकार गोविंद महाराज गोरे यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने हरिनाम गजरात सप्ताह संपन्न झाला. सप्ताहात महापूजा, काकड आरती, ज्ञानेश्वरी व गाथा पारायण, हरिपाठ, भजन, ग्रंथ दिंडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महिलांसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

### आंबेगाव तालुका निवडणूक प्रचार रंगला उग्र आणि उत्साही

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. उमेदवार व प्रचारक शेतकरी, घरगृहस्थ, वाढदिवस समारंभ, पिकांची हालचाल व बाजारभाव यांचा आढावा घेत मतदारांशी थेट संपर्क साधत आहेत. सकाळी नाष्ट्यानंतर दुपारी जेवण करून पुन्हा प्रचारात झोंबल्याने दमछाक जाणवत असले तरी प्रत्येक उमेदवार मतदान वाढवण्यावर लक्ष केंद्रीत करत आहे. घराघरांत जाणे, सामाजिक कार्यक्रमात सहभागी होणे आणि शेतकरी व नागरिकांचे विश्वास जिंकणे ही सर्व रणनीती प्रचारात दिसत आहे.

---

### शेतकरी अडचणीत; २ हजार ७९२ पिशव्यांची आवक; एक नंबर कांद्याला दहा किलोस २२१ रुपये भाव

# आळेफाटा उपबाजारात कांद्याची विक्रमी आवक; भावात घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी :** जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा येथील उपबाजारात शुक्रवारी कांद्याची विक्रमी आवक झाली. एकूण ३२ हजार ७९२ कांदा पिशव्या बाजारात दाखल झाल्या. प्रतवारीनंतर एक नंबर नवीन कांद्यास दहा किलोस १९० ते २२१ रुपये, तर उच्च प्रतिच्या एक नंबर कांद्याला कमाल २२१ रुपये बाजारभाव मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती संजय काळे, माजी उपसभापती प्रितम काळे आणि कार्यालय व्यवस्थापक सतीष म्हस्करे यांनी दिली.



शुक्रवार, दि. २३ रोजी झालेल्या लिलावात विविध प्रतवारीनुसार कांद्याचे दर निश्चित झाले. एक नंबर सुपर कांद्यास दहा किलोस १७० ते १९० रुपये, दोन नंबर कांद्यास १५० ते १७० रुपये, तर तीन नंबर गोल्टी कांद्यास १३० ते १५० रुपये बाजारभाव मिळाला. याशिवाय बदला कांद्यास ३० ते १०० रुपये असा भाव नोंदवण्यात आला. मोठ्या प्रमाणावर झालेल्या आवकेमुळे बाजारात चांगली चुरस पाहायला मिळाली, मात्र एकूणच कांद्याच्या दरात घट होत असल्याचे चित्र स्पष्ट झाले.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून आळेफाटा उपबाजारात कांद्याची आवक सातत्याने वाढत आहे. सध्या नवीन कांद्याची काढणी जोरात सुरू असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर कांदा विक्रीसाठी बाजारात आणत आहेत. परिणामी बाजारात पुरवठा वाढल्याने दरावर दबाव येत असून, पंधरा दिवसांपूर्वी दहा किलोस २५० रुपये भाव मिळणारा कांदा आता २ ते ३ रुपये किलोने घसरलेला असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

कांद्याचे भाव घसरत चालल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. लागवड खर्च, मजुरी, खत-औषधे आणि वाहतूक खर्च वाढले असताना अपेक्षित दर न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. "आवक वाढली की भाव कमी होतात, हीच परिस्थिती पुन्हा एकदा अनुभवायला मिळत आहे," असे मत अनेक शेतकऱ्यांकडून व्यक्त केले जात आहे.

यासंदर्भात आळेफाटा उपबाजारातील कांदा व्यापारी रामदास शिंदे, तान्हाजी कु-हाडे, संतोष कु-हाडे, अनिल गडगे, ज्ञानेश्वर गाढवे, शिवप्रसाद गोळवा, विजय कु-हाडे, सचिन डावखर, सागर कु-हाडे, चैतन्य कु-हाडे, शरीफ पटेल, सचिन जाधव, संदीप लोढा, युवराज खोत, संतोष गांधी, भळगट मामा, पापा मोमीण आणि अरिफ पटेल यांनी सांगितले की, सध्या बाजारात नवीन कांद्याची आवक प्रचंड प्रमाणात होत आहे.

काढणी एकाच वेळी झाल्याने बाजारात स्पर्धा वाढली असून, त्याचा थेट परिणाम दरांवर होत आहे.

एकीकडे विक्रमी आवक आणि दुसरीकडे घटते दर यामुळे बाजारात उलटसुलट चित्र निर्माण झाले आहे. आगामी काही दिवसांत आवक अशीच राहिल्यास कांद्याच्या दरात आणखी चढ-उतार होण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचे लक्ष आता पुढील बाजारभावाकडे लागून राहिले आहे.

**कांदा दर – प्रतवारीनुसार बाजारभाव**

- एक नंबर नवीन कांदा : १९० ते २२१ रुपये (दहा किलोस)
- एक नंबर सुपर कांदा : १७० ते १९० रुपये
- दोन नंबर कांदा : १५० ते १७० रुपये
- तीन नंबर (गोल्टी) कांदा : १३० ते १५० रुपये
- बदला कांदा : ३० ते १०० रुपये
- एकूण आवक : ३२,७९२ कांदा पिशव्या
- बाजार दिनांक : शुक्रवार, दि. २३
- ठिकाण : आळेफाटा उपबाजार, जुन्नर

---

## 'मर्मबंध' आणि 'कवडसे' काव्यसंग्रहांचा नारायणगाव येथे दिमाखदार प्रकाशन सोहळा

### ज्येष्ठ कवयित्री सुलभा वेठेकर यांच्या कवितांना रसिकांची उत्स्फूर्त दाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकारफाटा :** शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यातील धोलवड गावची सुकन्या आणि पिंपरी पेंढार येथील वेठेकर परिवाराची सूनबाई असलेल्या ज्येष्ठ कवयित्री सौ. सुलभा वेठेकर यांनी लिहिलेल्या आणि लोकसंस्कृती प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेल्या 'मर्मबंध' व 'कवडसे' या दोन कविता संग्रहांचा भव्य प्रकाशन सोहळा नारायणगाव येथील द्वारकामाई, श्री साईबाबा मंदिर सभागृहात शुक्रवार, दि. १७ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला.



या काव्यसंग्रहांचे प्रकाशन सत्यशिलदादा शेरकर (अध्यक्ष, विघ्नहर सहकारी साखर कारखाना), नरेंद्रजी वाबळे (अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघ), शिवाजीराव चाळकसाहेब (शिवांजली परिवार), संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. लता पाडेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या वर्षा काळे देशपांडे, प्रविण डुंबरे, स्तंभलेखक संजय नलावडे, प्रा. रतिलाल बाबेल, सनय प्रकाशनचे शिवाजीराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास धोलवडचा काळे परिवार तसेच पिंपरी पेंढारच्या वेठेकर परिवारातील सदस्यांसह दोन्ही गावांतील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'मर्मबंध' आणि 'कवडसे' या दोन्ही काव्यसंग्रहांत सामाजिक, भावनिक, स्त्रीजीवन, नातेसंबंध, लोकसंस्कृती असे सर्वस्पर्शी विषय अत्यंत प्रभावी आणि सुलभ शैलीत मांडण्यात आले असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

सुलभा वेठेकर यांचे यापूर्वी तीन काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून, त्यांचे प्रकाशन मुंबई येथे झाले होते. मात्र हे दोन काव्यसंग्रह गावी प्रकाशित झाल्याने जुन्नर तालुक्यातील रसिकांना आपल्या भागातील एवढ्या मोठ्या कवयित्रीची ओळख नव्याने झाल्याचे गौरवोद्गार इंजिनिअर शिवाजीराव चाळकसाहेब यांनी काढले. या काव्यसंग्रहांच्या प्रकाशनासाठी सुलभा वेठेकर यांच्या कन्या व जावई — वैशाली व महेश पवार, माधुरी व सुनील गावडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अरुण वेठेकर, शैलेश काळे, शिवाजी शिंदे आणि अभिजित वेठेकर यांनी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन सौ. शितल ठुसे यांनी केले, तर कवयित्री सुलभा वेठेकर यांनी उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले.

---

## चिल्हेवाडीत मतदान जनजागृती

### बालचमूची प्रभातफेरी; ढोल-ताशांच्या गजरात 'चला मतदान करूया'चा निनाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकारफाटा :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर चिल्हेवाडी गावात मतदान जनजागृतीसाठी प्रभावी उपक्रम राबविण्यात आला. गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानात सर्व मतदार बंधू-भगिनींनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी चिल्हेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून नागरिकांमध्ये जनजागृती केली.




ढोलाच्या गजरात व उत्साहपूर्ण वातावरणात निघालेल्या या प्रभातफेरीत बालचमूने लोकशाहीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या घोषणा देत संपूर्ण गाव जागृत केले. "चला मतदान करूया, देशात लोकशाही रुजवूया", "५ फेब्रुवारीला मतदान करा", "मतदान हा आपला हक्क आणि कर्तव्य" अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित केले.

**लोकशाही मूल्यांची विद्यार्थ्यांकडून जाणीव**

या प्रभातफेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी लोकशाहीवरील निष्ठेची सामूहिक शपथ घेतली. "आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करू, मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकीचे पावित्र्य राखू आणि कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता निर्भयपणे मतदान करू," अशी शपथ यावेळी विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली.

**ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग**

या जनजागृती कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जीवन मुंढे, राजेंद्र भोईर, हरीभाऊ भोईर, महादू भोईर, शुभम भोईर, लक्ष्मी भोईर, लता भोईर, जाईबाई तातळे, जयश्री भोईर यांच्यासह अनेक नागरिक या उपक्रमात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून ग्रामस्थांनीही मतदानासाठी सज्ज राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

**शिक्षकांचे मार्गदर्शन आणि नियोजन**

या संपूर्ण कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन चिल्हेवाडी शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर दिघे व उपशिक्षक जनार्दन केदारी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजात मतदानाबाबत जागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, अशा उपक्रमांमुळे लोकशाही अधिक बळकट होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

---

## १४ मार्च रोजी जुन्नरमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

### जिल्हा व सत्र न्यायालयासह तालुका न्यायालयांत तडजोडीने जलद व मोफत न्यायाची संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीच्या माध्यमातून विविध प्रकारची प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याची सुवर्णसंधी पक्षकारांना उपलब्ध होणार आहे.



**कोणती प्रकरणे निकाली काढली जाणार?**

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दाखलपूर्व (Pre-litigation) प्रकरणे तसेच न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडयोग्य दिवाणी व फौजदारी प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने वीज व पाणी बिल देयके, बँक कर्ज वसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावे, कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, कर्मचारी नुकसान भरपाई प्रकरणे तसेच इतर तडजोडीने सोडवता येणाऱ्या प्रकरणांचा समावेश आहे.

**तडजोडीतून दोन्ही पक्षांचा विजय**

लोकअदालतीत प्रकरणे परस्पर संमतीने व तडजोडीने निकाली काढली जात असल्याने कोणताही पक्ष हरत नाही. तडजोडीमुळे न्यायालयीन प्रक्रिया सुलभ होते, वेळेची बचत होते आणि आर्थिक खर्चही टाळता येतो. विशेष म्हणजे, लोकअदालतीत प्रलंबित खटले निकाली काढल्यास भरलेली न्यायालयीन फी पक्षकारांना परत मिळते.

**लोकअदालतीचे ठळक फायदे**

लोकअदालतीचा लाभ घेतलेल्या पक्षकारांना अनेक फायदे मिळतात. जलद, मोफत व सुलभ न्याय, दोन्ही पक्षांमध्ये समेट व सौहार्दपूर्ण तोडगा, तसेच लोकअदालतीचा निर्णय दिवाणी न्यायालयाच्या डिक्रीप्रमाणे अंतिम असतो. या निर्णयाविरुद्ध कोणतेही अपील करता येत नसल्यामुळे प्रकरण कायमस्वरूपी निकाली निघते.

**संपर्क साधण्याचे आवाहन**

ज्या पक्षकारांना आपली प्रकरणे लोकअदालतीत ठेवायची आहेत, त्यांनी संबंधित न्यायालयाशी किंवा जुन्नर तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर येथे आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

---

## धामणीत शाश्वत विकासासाठी युवकांचे श्रमसंस्कार

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयाचे सात दिवसीय विशेष शिबीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व भीमाशंकर शिक्षण संस्था संचलित दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालय, दत्तात्रयनगर-पारगाव आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासासाठी युवक – पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन' या विषयावर आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर धामणी येथे शुक्रवार (दि.१६) ते गुरुवार (दि.२२) या कालावधीत यशस्वीरीत्या पार पडले. शिबिराचा समारोप गुरुवार (दि.२२) रोजी उत्साहात करण्यात आला.



या सातदिवसीय शिबिरात स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन व सामाजिक जाणीव यावर भर देत विविध उपक्रम राबवले. धामणी गावातील खंडोबा मंदिर, मुक्ताई माता मंदिर, हनुमान मंदिर, महादेव मंदिर, बाजारपेठ, स्मशानभूमी तसेच संपूर्ण गाव परिसराची स्वच्छता करण्यात आली. याशिवाय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व श्री शिवाजी विद्यालय येथेही स्वच्छता मोहिम राबवण्यात आली.

**ग्रामविकासासाठी जनजागृती**

शिबिरादरम्यान स्वयंसेवकांनी ग्राम सर्वेक्षण करून ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. आरोग्य शिबिर, घनकचरा व्यवस्थापनाविषयी रॅली, तसेच पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. सहाव्या दिवशी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्याचबरोबर विविध विषयांवरील व्याख्यानांद्वारे स्वयंसेवकांचे प्रबोधन करण्यात आले.

**'NSS हा संस्कार घडवण्याचा योग्य काळ' – प्राचार्य डॉ. नाथा मोकाटे**

समारोपप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नाथा मोकाटे म्हणाले, "स्वतःसाठी नव्हे तर दुसऱ्यासाठी जीवन जगणे आवश्यक आहे. सात दिवसांचे श्रमसंस्कार शिबिर विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवते. राष्ट्रीय सेवा योजना हा संस्कार घडवण्याचा योग्य काळ आहे. स्वामी विवेकानंदांच्या विचारांनुसार युवक हेच देशाच्या प्रगतीचे शिल्पकार आहेत."

**उत्कृष्ट स्वयंसेवकांचा सन्मान**

यावेळी महाविद्यालयीन पातळीवर रोहित नाणेकर व ऋतुजा जाधव यांची उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून निवड करून सन्मान करण्यात आला. काही स्वयंसेवक-स्वयंसेविकांनी आपल्या मनोगतातून शिबिरातील अनुभव व्यक्त केले.

---

### विषय समित्यांच्या निवडी रखडल्या; सभागृहात गोंधळ, पोलिसांचा बंदोबस्त

## जुन्नर नगर परिषदेची विशेष सभा गणपूर्तीअभावी रद्द; सत्ताधारी-विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नर नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक पार पडल्यानंतर विषय समित्यांच्या सभापती व सदस्यांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आदेशानुसार दि. २३ रोजी सकाळी ११ वाजता नगर परिषद सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. पीठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी चरण कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार होती. मात्र आवश्यक गणपूर्ती न झाल्याने या विशेष सभेचे पुढील कामकाज रद्द करण्यात आल्याची माहिती पीठासीन अधिकाऱ्यांनी दिली.




या विशेष सभेत बांधकाम, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज तसेच महिला व बालकल्याण विषय समित्यांचे सभापती आणि सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडणार होती. सभेसाठी किमान ११ नगरसेवकांची उपस्थिती आवश्यक असताना प्रत्यक्षात केवळ ९ सदस्य सभागृहात उपस्थित होते. त्यामुळे गणपूर्तीअभावी विषय समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन, सभापती पदाची निवड तसेच स्थायी समितीचे गठन हे सर्व कामकाज होऊ शकले नाही.

सभेसाठी शिवसेना नगराध्यक्षा सुजाता काजळे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्या वैष्णवी पांडे, नगरसेवक सना मन्सूरी, रुपाली परदेशी, अनुजा पातूरकर, वाजीद इनामदार, प्रशांत सराईकर, आकीफ इनामदार, साकी सय्यद तसेच स्वीकृत नगरसेवक भाऊ कुंभार उपस्थित होते. मात्र सत्ताधारी शिवसेनेचे काही नगरसेवक तसेच भाजपचे दोन नगरसेवक गैरहजर राहिल्याने सभा रद्द करावी लागली.

दरम्यान, सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) व शिवजन्मभूमी विकास मंचाचे गटनेते विक्रम परदेशी यांनी या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना सांगितले की, दि. १३ जानेवारी रोजी उपनगराध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया तत्कालीन पीठासीन अधिकारी व नगराध्यक्षा यांनी बेकायदेशीरपणे राबविली. सत्ताधारी पक्षाच्या उपनगराध्यक्ष पदाचा अर्ज बेकायदेशीररित्या फेटाळण्यात आला असून या संपूर्ण निवड प्रक्रियेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे दाद मागण्यात आली आहे. मात्र अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्याने पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनुसार विषय समितीच्या प्रक्रियेदरम्यान शिवसेनेचे सर्व नगरसेवक गैरहजर राहिले, असे त्यांनी स्पष्ट केले.

याउलट राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्या वैष्णवी पांडे यांनी पीठासीन अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सकाळी ११ वाजता सभा सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन मिनिटांत गणपूर्तीअभावी निवडणूक प्रक्रिया रद्द जाहीर करून पीठासीन अधिकारी सभागृहातून निघून गेल्याचा आरोप त्यांनी केला. हे वर्तन बेकायदेशीर व लोकप्रतिनिधींचा अवमान करणारे असल्याचे सांगत या प्रकरणी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करून कारवाईची मागणी केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष सभा रद्द झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सभागृहात ठिय्या आंदोलन करण्याच्या भूमिकेत बसून राहिले.

---

## आळंदी देवस्थानच्या प्रमुख विश्वस्तपदी भावार्थ देखणे यांची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीच्या प्रमुख विश्वस्तपदी बी. व्ही. जी. इंडिया लिमिटेड कंपनीचे एच. आर. हेड, प्रसिद्ध कीर्तनकार व भारूडकार डॉ. भावार्थ देखणे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड एकमताने झाल्याची माहिती संस्थानचे मुख्य व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दिली.



या निवडीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीच्या कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत पुढील एक वर्षासाठी प्रमुख विश्वस्तपदाची जबाबदारी डॉ. भावार्थ देखणे यांच्याकडे सोपविण्यात आली. बैठकीस विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विधीतज्ज्ञ राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, विधीतज्ज्ञ रोहिणी पवार, मुख्य व्यवस्थापक माऊली वीर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. मुख्य व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले की, डॉ. भावार्थ देखणे यांनी सन २०२५ च्या श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख म्हणून यशस्वीपणे काम पाहिले असून, त्यांचा प्रशासनातील अनुभव, अध्यात्मिक क्षेत्रातील योगदान आणि संघटन कौशल्य लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### अंधेरी न्यायालयात वकिलांमध्ये दणादण

मुंबई, अंधेरी : सत्र न्यायालयात आज वकिल वाहिद शेख आणि अभिषेक त्रिपाठी यांच्यात कोर्टरूममध्ये जोरदार मारहाण झाली. प्रत्यक्षदर्शींनुसार, वाहिद शेख यांनी त्रिपाठी यांना ओढत लाथा-बुक्क्यांनी हल्ला केला. घटना इतकी तीव्र होती की उपस्थित कर्मचारी व लोक धावून परिस्थिती नियंत्रणात आणण्यास लागले. मारहाणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून न्यायालयातील शिस्त आणि वकिलांच्या वर्तनावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. संबंधित वकिलांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

### राहुल गांधी यांच्या विधानामुळे भाजप संतप्त

नवी दिल्ली : 'मनरेगा'चे नाव बदलून मंजूर केलेल्या 'व्हीबी जी राम जी' कायद्यावरून राजकीय संघर्ष सुरूच आहे. विशेषतः, काँग्रेस आणि भाजपदरम्यान आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या कायद्याविषयी सातत्याने भाजपवर टीकेची झोड उठवल्यामुळे भाजप संतप्त झाला आहे. गुरुवारी राहुल गांधी यांनी 'व्हीबी-जी-आरएएमजी' कायद्याचे नेमके नाव माहीत नसल्याचे म्हटले होते.

---

### संगीतकार पलाश मुच्छलविरोधात फसवणुकीचा आरोप

मुंबई : भारतीय क्रिकेटपटू स्मृती मनधनासोबतचे लग्न मोडल्यानंतर चर्चेत आलेला गायक आणि संगीतकार पलाश मुच्छल नव्याने वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सांगली जिल्ह्यातील ३४ वर्षीय अभिनेते आणि निर्माता विज्ञान माने यांनी पोलिसांकडे तक्रार करत आरोप केला आहे की, पलाशने त्यांची ४० लाख रुपयांची फसवणूक केली आहे.

# आशिया खंडातील सर्वात मोठा स्कायवॉक डेकचे काम पूर्ण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चिखलदरा :** विदर्भाच्या नंदनवनात दऱ्या-खोऱ्यांचा लाइव्ह अनुभव घेण्याची संधी आता पर्यटकांना मिळणार असून देशभरातील पर्यटकांसाठी ही गुड न्यूज आहे. आशिया खंडातील सर्वात मोठ्या स्कायवॉकच्या अतिशय महत्त्वाच्या डेकचे काम आजच पूर्ण झाले असून मार्च महिन्यात या स्कायवॉकचा मुहूर्त निश्चित असल्याचे मानल जाते.

चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन असून थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणी संपूर्ण देशासह जगभरातील पर्यटक हजेरी लावतात. येथे जंगल सफारी व व्याघ्र प्रकल्प असल्यामुळे देशभरातून पर्यटकांची पहिली पसंती चिखलदरा आहे. कॉफीच्या बागा, प्रसन्न वातावरण, पशु-पक्षांच्या शेकडो प्रजाती, डोंगर- दऱ्यांच्या या परिसरात निसर्गाच्या सानिध्यात रममाण होण्याची प्रत्येकाचीच इच्छा असते. आता त्यातच आशिया खंडातील सर्वात मोठ्या स्कायवॉकचे काम आटोपण्याची स्थिती असल्याने साऱ्यांची उत्सुकता ताणल्या गेली आहे. मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण झालेच पाहिजे अशा प्रकारचे आदेश शासनामार्फत देण्यात आले आहेत.

**डेकचे काम पूर्ण, काच लागणार**

**स्कायवॉकचे स्ट्रक्चर पूर्ण उभे झाले असून कंत्राटदार पूर्ण क्षमतेने काम करीत आहेत. आता काच लावणे व इतर किरकोळ कामे केली जाणार आहेत. त्यासाठी काही कालावधी लागू शकतो. डेकचे काम आज पूर्ण झाले आहे. सपोर्टची सुद्धा तात्पुरती परवानगी मिळाली आहे. मार्च पर्यंत काम पूर्ण होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.**

# काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नसीमुद्दीन सिद्दीकी यांनी पक्ष सोडला

## उत्तर प्रदेशात राजकारणात खळबळ: दोन डझन माजी आमदारांसह 72 नेते राजीनामा देऊन काँग्रेसला धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनऊ : पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील राजकारणात मोठी हलचाल झाली आहे. काँग्रेसचे पश्चिम उत्तर प्रदेशचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री नसीमुद्दीन सिद्दीकी यांनी पक्षाचा राजीनामा दिला असून, त्यांच्यासह तब्बल ७२ नेते, ज्यात दोन डझन माजी आमदारांचा समावेश आहे, काँग्रेस सोडल्याचे समोर आले आहे.**

सिद्दीकी यांनी पक्षाध्यक्ष मलिककार्जुन खरगे, माजी अध्यक्षा सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी, उत्तर प्रदेश प्रभारी अविनाश पांडे व प्रदेशाध्यक्ष अजय राय यांच्याकडे आपला राजीनामा पाठवला आहे. या घटनेमुळे काँग्रेस पक्षाला उत्तर प्रदेशात पुन्हा सत्तेत पुनरागमन करण्याच्या प्रयत्नांवर मोठा धक्का बसला आहे.

**सिद्दीकींच्या निवेदनातील मुद्दे**

राजीनामा देताना सिद्दीकी यांनी पक्षातील कार्यशैली व अंतर्गत परिस्थितीमुळे अस्वस्थ असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या सूचना आणि भूमिकेचा संघटनेत योग्य विचार केला गेला नाही. तरीही त्यांनी कोणत्याही नेत्यावर आरोप केला नाही. त्यांनी सांगितले की, जातीयवाद व सांप्रदायिकतेच्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी काँग्रेसमध्ये सामील झाले होते, परंतु पक्षात ही लढाई प्रभावीरीत्या चालू ठेवता आली नाही.

सिद्दीकी यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय पूर्णपणे वैयक्तिक आहे आणि कोणत्याही काँग्रेस



पदाधिकाऱ्यावर त्यांचा संताप नाही. राजीनाम्यानंतर त्यांनी सर्व सहकाऱ्यांशी सल्लामसलत सुरू केली असून, भविष्यात कोणत्या पक्षासोबत काम करावे याचा विचार करत आहेत.

**राजकीय प्रभाव**

उत्तर प्रदेशातील महत्त्वाच्या राज्यात काँग्रेससाठी ही घटना चिंताजनक ठरली आहे. माजी प्रदेशाध्यक्षासह मोठ्या संख्येने नेते पक्ष सोडल्याने भाजप व अन्य विरोधी पक्षांसाठी राजकीय संधी निर्माण झाली आहे. आगामी निवडणुकीच्या रणनीतीवर या राजीनाम्याचा थेट परिणाम होणार असल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

सद्य परिस्थितीत सिद्दीकी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढील राजकीय पावल्या आणि कोणत्या पक्षासोबत ते पुढे जातील, ह्यावर उत्तर प्रदेशातील राजकीय वर्तुळाची नजर लागली आहे.

# जि. प, पंचायत समित्यांतही येणार 'स्वीकृत सदस्य'

## महसूलमंत्र्यांच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री सकारात्मक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** महापालिका आणि नगरपालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य' नियुक्त करण्याचा प्रस्ताव महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला असून मुख्यमंत्र्यांनी त्यावर सकारात्मकता दर्शविली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. बावनकुळे म्हणाले, ग्रामीण भागात अनेक लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञ व्यक्ती विविध सामाजिक क्षेत्रांत उत्तम काम करतात. मात्र, जिल्हा परिषद निवडणुकीत महिला आरक्षण किंवा एससी, एसटी आरक्षणामुळे अनेक अनुभवी आणि अभ्यासू व्यक्तींना निवडणूक लढवता येत नाही. या तज्ज्ञ लोकांच्या अनुभवाचा फायदा ग्रामीण विकासासाठी व्हावा, या हेतूने त्यांना 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी द्यावी, अशी आग्रही मागणी आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि ग्रामविकासमंत्र्यांशीही याबाबत चर्चा झाली. हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणि त्यानंतर विधिमंडळात मंजुरीसाठी येईल.

# इराणमुळे युद्धाचा मोठा भडका?

## ट्रम्प यांची थेट धमकी; अमेरिकन युद्धनौका इराणच्या दिशेने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव पुन्हा एकदा टोकाला पोहोचला असून, दोन्ही देशांमधील संघर्ष मोठ्या युद्धात रूपांतर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट इशारा दिल्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या युद्धनौका आणि सैन्यदल इराणच्या दिशेने रवाना झाल्याची माहिती स्वतः ट्रम्प यांनी दिल्याने परिस्थिती अधिकच चिघळली आहे. इराणमध्ये सध्या सत्ताधाऱ्यांविरोधात तीव्र आंदोलन सुरू असून, या आंदोलनात आतापर्यंत शेकडो नागरिकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी आंदोलनकर्त्यांच्या समर्थनार्थ भूमिका घेत इराण सरकारला थेट धमकी दिली आहे. आंदोलकांवर होणारी कारवाई त्वरित थांबवावी, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा अमेरिकेने दिला आहे.

**ट्रम्प यांची थेट धमकी**

डोनाल्ड ट्रम्प यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, "आमच्या युद्धनौका आणि सैनिक इराणच्या दिशेने निघाले आहेत.

**इराणचा आक्रमक पवित्रा**

अमेरिकेच्या या धमकीनंतर इराणनेही जशास तसे उत्तर देण्याची तयारी दर्शवली आहे. इराणच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेकडून होणारा कोणताही हल्ला थेट युद्ध म्हणूनच पाहिला जाईल. "आमच्याकडे येणारे अमेरिकन सैन्य हल्ल्यासाठी नसेल, अशी अपेक्षा आहे. मात्र, कोणत्याही परिस्थितीत देशाच्या सुरक्षेसाठी कठोरात कठोर पावले उचलण्यास आम्ही तयार आहोत," असे त्यांनी स्पष्ट केले.

### केंद्रप्रमुख पदासाठी विभागीय स्पर्धा

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) पदासाठी विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा २०२५ जाहीर करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षकांमधून केंद्रप्रमुख पदावर नियुक्तीसाठी ही परीक्षा घेतली जाणार असून, ही परीक्षा पूर्णतः ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याचे परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांना या परीक्षेद्वारे संधी दिली जाणार आहे. परीक्षा ३ आणि ४ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.

# काँग्रेसच्या ४० स्टार प्रचारकांची यादी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समिती निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या यादीत महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार, खासदार छत्रपती शाहू महाराज, विधान परिषदेतील गटनेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस खा. मुकुल वासनिक, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य बाळासाहेब थोरात, खासदार रजनीताई पाटील, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभा खासदार इम्रान प्रतापगढी, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, अखिल भारतीय कार्य समितीचे सदस्य नसीम खान, अखिल भारतीय कार्य समितीच्या सदस्या यशोमती ठाकूर, खासदार प्रणिती शिंदे, आमदार अमिन पटेल, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, आ. अमित देशमुख, आ. डॉ. विश्वजित कदम, अनिस अहमद, माजी मंत्री रमेश बागवे, माजी खा. हुसेन दलवाई, आ. साजिद खान पठाण, माजी मंत्री वसंत पुरके, माजी आमदार धिरज देशमुख, रामहरी रुपनवर, एम. एम. शेख, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष यशपाल भिंगे, मुफ्ती हारुन नदवी, शाह आलम शेख, महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, अक्षय राऊत व हनुमंत पवार यांचा या यादीत समावेश आहे.

# 'लवचिक' भूमिकेत स्वार्थ नाही

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महापालिकेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिल्याने ठाकरे सेना विरुद्ध मनसे असा कलगीतुरा सुरू झाला आणि ठाकरे बंधूंच्या प्रेमात मिठाचा खडा पडला, अशी चर्चा सुरू असतानाच मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आपल्या 'लवचिक' भूमिकेचे समर्थन केल्याने नव्याच चर्चेला तोंड फुटले आहे. राजकारणात कधीतरी बाळासाहेब ठाकरेंना पण लवचिक भूमिका घ्यावी लागली म्हणून त्यांचे मराठी माणसावरचे



प्रेम तसूभर पण कमी झाले नाही. उलट ते अधिकच दृढ होत गेले. हेच संस्कार आमच्यावर आहेत, असे सांगत राज ठाकरे म्हणाले, आरपार बदललेल्या राजकारणात कधीतरी थोडी लवचिक भूमिका घेतली, तरी ती माझ्या व्यक्तिगत फायद्यासाठी किंवा स्वार्थासाठी कधीही नसेल! शुक्रवारी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशत-ाब्दीचे औचित्य साधत राज ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. राज म्हणाले, बाळासाहेबांसारखी प्रतिभा परत कधी बघायला मिळणार नाही हे जितके खरे आहे तितकेच बाळासाहेबांसारखे राजकारण करणे यापुढे कोणालाच जमणार नाही. पण, त्यांच्या प्रतिमेला कुठेही धक्का लागणार नाही आणि त्यांनी मराठी भाषेसाठी, मराठी माणसासाठी उभारलेला लढा हा मात्र धगधगत राहील, हे पाहणे बाळासाहेबांच्या पुढच्या पिढ्यांच्या हातात आहे आणि ते आम्ही नेटाने करू, हा आमचा मराठी माणसाला शब्द आहे. राज ठाकरे म्हणाले की, आज निष्ठा सहज विकल्या जातात. तत्त्व सहज फेकून दिली जातात, आणि राजकारण हे पूर्ण व्यवहारी झाले आहे. रा

### कंगाल महापालिकेची उधळपट्टी सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर :** महापालिकेची नाजूक आर्थिक स्थिती पुढे करीत एकीकडे प्रशासनाने पाणीपुरवठा योजनेसाठी कर्ज घेत स्वहिस्सा उभा केला. तर दुसरीकडे खर्चाला लगाम लावण्याऐवजी प्रशासनाची उधळपट्टी सुरूच आहे. गेल्या चार वर्षांपासून महापालिकेच्या सर्वसाधारण सभागृहाच्या नूतनीकरणाचे काम सुरू असून या कामाचा खर्च ५ कोटींवर तब्बल १० कोटींवर गेले आहे.

सर्व साहित्य निविदा प्रक्रियेप्रमाणेच असताना दुपटीने खर्च वाढलाच कसा, असा सवाल उपस्थित होत आहे. महापालिका प्रशासनाकडून नेहमीच नगर-सेवकांवर उधळपट्टी करण्याचा आरोप केला जातो. परंतु, मागील पाच वर्षांपासून महापालिकेवर प्रशासक राज आहे. या काळात महापालिकेवरील कर्जाचे ओझे आणि कंत्राटदारांची देणी त्यासोबतच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतना यांच्या थकबाकीचा आकडा तब्बल १२०० कोटींवर गेला आहे. एवढे असतानाही महापालिका प्रशासनाने खर्चाला लगाम लावण्याऐवजी उधळपट्टी सुरूच ठेवली आहे. त्यात केवळ महापालिकेच्या नव्या सभागृहाच्या कामाचाच विचार केला. तर तब्बल तीन वर्षांत या कामाचा खर्च ५ कोटींवर तब्बल १० कोटींवर गेला आहे. एवढेच काय तर महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांप्रमाणेच प्रशासनाने प्रशासकांना खूश करण्यासाठी त्यांच्या आयुक्त दालनाचे नूतनीकरण केले. या कामावर देखील कोट्यवधींचा खर्च केला महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक असतानाच उधळपट्टी सुरूच आहे.

### एकाच दिवसांत 2 खून; अल्पवयीन आरोपी ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर :** उधारीच्या पैशाच्या वादातून शहरात दोन ठिकाणी तरुणांवर घातक शस्त्राने हल्ला करून खून केल्याच्या धक्कादायक घटना घडल्या आहेत. गिट्टीखदान आणि अजनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या दोन वेगवेगळ्या घटनांनी नागपूर शहर हादरून गेले. या प्रकरणात अजनी पोलिसांनी एका अल्पवयीन आरोपीस ताब्यात घेतले असून, गिट्टीखदान पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. गिट्टीखदान पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या घटनेत हर्षु ऊर्फ गुड्डू शिवानंदन पांडे (वय ३८, रा. कामगार नगर, मानकापूर) यांचा खून झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हर्षु याने बंटी ऊर्फ बुर्हान शेख (पानठेलेवाला) (रा. अवस्थीनगर




चौक, मानकापूर) याच्याकडून दहा हजार रुपये उधार घेतले होते. मात्र, काही दिवसांपूर्वी हर्षुने पसै देण्यास टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्यातून बंटी आणि त्याच्यात वाद सुरू झाला. अनेकदा दोघांमध्ये शिवीगाळ आणि धक्काबुक्कीही झाली. त्यामुळे बंटीच्या मनात त्याच्याविषयी राग निर्माण झाला. त्यातून गुरुवारी रात्री ११ ते ११.३० च्या दरम्यान मिलन ऊर्फ बंटी वानखेडे यांचा मित्र हर्षु पांडे हा फोनवर बोलण्यासाठी थोडा बाजूला गेला असता, आरोपी बंटी व त्याचे काही साथीदार वाहनाने तेथे आले. जुन्या वादातून त्यांनी शिवीगाळ करीत 'अवजार काढा' असे म्हणत हर्षुच्या डोक्यावर घातक शस्त्राने वार केला. यामुळे गंभीर जखमी अवस्थेत त्याला मेयो रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी गिट्टीखदान माहिती मिळताच, त्यांनी ताफ्यासह घटनास्थळी फॉरेन्सिक टीमसह दाखल झाले. पंचनामा करीत पोलिसांनी आरोपी व त्याच्या साथीदारांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. पोलिस त्याच्यासह साथीदारांचा शोध घेत आहेत. अजनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत दुसरी खळबळजनक घटना घडली. योगेश अनिल काकडे (वय २८, रा. श्रीकृष्ण नगर, वाठोडा) याचा अकराशे रुपयांच्या वादातून खून करण्यात आला. ही घटना रात्री १०.४५ ते ११.१० च्या सुमारास बेसा-मानेवाडा रोडवरील दीपक पान पॅलेससमोर घडली.

# शिवसेनेचे राज्यभरात लोकोपयोगी उपक्रम

## शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसेनेकडून 'आरोग्य आपल्या दारी', गडकोट स्वच्छता मोहीम, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' यासह अनेक लोकोपयोगी उपक्रमांची घोषणा शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक, मंत्री उदय सामंत, विधान परिषद उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, शिवसेना सरचिटणीस राहुल शेवाळे, उपनेत्या शीतल म्हात्रे व इतर प्रमुख नेते उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीनिमित्त



मुंबई महापालिकेच्या वतीने 'बाळासाहेब ठाकरे आरोग्य आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून घरोघरी आरोग्य तपासणी मोहीम सुरु केली जाईल. सुरुवातीला मुंबईत आणि त्यानंतर उर्वरित महाराष्ट्रात हे अभियान राबवू, अशी माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. मुंबई महापालिका रुग्णालयांमध्ये रुग्णांना झीरो प्रिस्क्रिप्शन आणि कॅशलेस सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. प्रदूषण नियामक मंडळाच्या माध्यमातून राज्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गडकोट किल्ले स्वच्छता मोहीम' राबवली जाणार आहे. या गडकोटांवर आरओ फिल्टर बसवले जातील, तसेच प्लास्टिक मुक्त गडकोट किल्ले अशी मोहीम हाती घेतली जाणार आहे. युनेस्कोने समावेश केलेल्या जागतिक वारसा यादीतील ११ किल्ल्यापासून ही मोहीम सुरु होईल. यात सहभागी होणाऱ्या शिवभक्तांना आणि संस्थांना १ लाख रुपये मानधन दिले जाणार आहे.

ते पुढे म्हणाले की, आरोग्य, शिक्षण याबरोबरच ज्येष्ठांसाठी एसटी संगे तिर्थाटन योजना, महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी १०० कोटी, मराठी भाषा संवर्धनासाठी १०० कोटी, रस्ता सुरक्षा मोहीमेसाठी १०० कोटीची तरतूद केली आहे. तसेच १० हजार विद्यार्थीनींना स्वसंरक्षणाचे धडे, शालेय शिक्षण विभागाकडून निबंध, वक्तृत्व, चित्रकला, व्यंगचित्रकला स्पर्धांचे आयोजन केले जाईल. झोपडपट्टीमुक्त मुंबईचे बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी म्हाडा, सिडको, एमएमआरडीए सारख्या संस्थांच्या माध्यमातून काम सुरु झाले आहे. ४० लाख मुंबईकरांना हक्काचे घर देणार आहोत, असे ते म्हणाले.

राज्यातील २९ महापालिका आणि ३९४ नगर परिषदांमध्ये 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबवले जाणार आहे. यासाठी नगर परिषदांना १ कोटी आणि महापालिकांना ३ कोटींचा निधी दिला जाईल, यासाठी नगर विकास खात्याकडून ५३९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. नगर पालिका आणि महापालिका शाळांमधून सर्वोत्कृष्ट पहिल्या तीन शाळांना गौरवण्यात येणार आहे. महापालिका शाळांसाठी अनुक्रमे १० लाख, ७ लाख आणि ५ लाख तर नगर परिषदेच्या शाळांसाठी अनुक्रमे ५ लाख, ३ लाख आणि २ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. राज्यातील ६ विभागांमधील १८ शाळांना या अभियानातून सन्मानित केले जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. शाळांचा दर्जा वाढवणे, सोयी सुविधांचा विकास आणि शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण तयार करण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी गावागावात सिंचन आणि पिण्याच्या पाण्यासाठी योजना सुरु केली आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की शिवसेनाप्रमुखांनी देशभर हिंदुत्व आणि मराठी अस्मितेचा हुंकार फुंकला. 'गर्व से कहो हम हिंदू है' हे म्हणण्याचे धाडस शिवसेनाप्रमुखांनी दाखवले. त्यांचे विचार घेऊनच शिवसेना पुढे जातेय, असे ते म्हणाले. शिवसेना चांदा ते बांदा घराघरात पोहोचली आहे. विधानसभा निवडणूक, नगर परिषद आणि महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना राज्यातील दुसरा मोठा पक्ष ठरला. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. एक कार्यकर्ता म्हणून बाळासाहेबांच्या आशिर्वादाने राज्याचे मुख्यमंत्री बनवण्याची संधी आपल्याला मिळाली, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. 'एनडीए'मध्ये शिवसेनेला मानसन्मान मिळतोय. अयोध्येत राम मंदीर निर्माण आणि काश्मिरमध्ये ३७० कलम हटवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी घेतला आणि बाळासाहेबांसह कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न पूर्ण केले,

### दावोसमधील ३० लाख कोटींच्या गुंतवणुकीचा दावा खोटा : काँग्रेस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्रात झालेल्या ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा दावा खोटा आहे, असा आरोप काँग्रेसने केला. मुख्यमंत्र्यांनी केलेले दावे केवळ कागदावरचे असून प्रत्यक्ष जमिनीवर त्याचे कोणतेही ठोस परिणाम दिसत नसल्याचा आरोपही काँग्रेसने केला. पत्रकार परिषदेत महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले, मागील तीन वर्षांत सुमारे ५० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात आल्याचे सरकार सांगत आहे. ही रक्कम जवळपास महाराष्ट्राच्या एकूण जीडीपीएवढी आहे. मात्र, एवढ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब राज्यातील उद्योग, रोजगार किंवा आर्थिक स्थितीत कुठेही दिसत नसल्याचे ते म्हणाले. २०१८ साली झालेल्या 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' परिषदेतही १६ लाख



कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे दावे करण्यात आले होते, असे सांगत लोंढे यांनी सरकारवर उपरोधिक टीका केली. जर प्रत्यक्षात एवढी गुंतवणूक झाली असती तर राज्यावरील कर्जाचा डोंगर कमी झाला असता, शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले असते आणि 'लाडकी बहीण' योजनेत महिलांना अधिक आर्थिक लाभ देता आला असता, असे ते म्हणाले. सरकारने तीन वर्षांत केलेल्या करारापैकी किती प्रकल्प प्रत्यक्षात सुरू झाले, किती कंपन्यांनी उत्पादन सुरू केले, किती रोजगारनिर्मिती झाली याची माहिती सरकारने जाहीर करावी, अशी मागणीही त्यांनी केली.